तात्काळ

क्र. पोमसं/१/बदली-पदोन्ती/५०-८६/२०२२
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,
मुंबई -४०० ००१.
दिनांक:- ३१/१२/२०२४

**संदर्भ:** शासन आदेश क्र.एच.डी.-११०४८/२७/२०२४/पोल-१अ, दि.३१/१२/२०२४

**विषय:-** पोलीस उप महानिरीक्षक/अपर पोलीस आयुक्त, पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान या संवर्गातील पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने पदस्थापनेबाबत.

****

उपरोक्त संदर्भाधिन आदेशान्वये पोलीस अधीक्षक/पोलीस उप आयुक्त, पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान या संवर्गातील अधिकारी यांची तात्पुरत्या स्वरुपात पोलीस उप महानिरीक्षक/अपर पोलीस आयुक्त या पदावर विहित अटींच्या अधीन पदोन्नतीने पदस्थापना करण्यात आली आहे (प्रत संलग्न).

२. नियंत्रक अधिकारी यांना कळविण्यात येते की, आदेशाधीन अधिका-यांच्या बाबतीत, तसेच त्यांच्या नवीन नियुक्तीच्या बाबतीत, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण/न्यायालय यांचे आदेश, कायदा व सुव्यवस्था विचारात घेऊन तात्काळ पुढील कार्यवाही करण्यात यावी.

३. उपरोक्त आदेशांतील अधिकाऱ्यांच्या पदभार हस्तांतरण प्रमाणपत्रांच्या प्रती कृपया सत्वर या कार्यालयास पाठवाव्यात.

( सुखविंदर सिंह )
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरीता.

प्रति,

श्री. ईश्वर दामू कांबळे, अपर पोलीस आयुक्त, पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान, बृहन्मुंबई

प्रत :-

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
अपर पोलीस महासंचालक व संचालक,पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत सस्नेह सादर,

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुर चौक, मुंबई
(लक्षवेध : श्री. संदीप ढाकणे, अवर सचिव)

प्रत माहितीकरिता :-अपर पोलीस महासंचालक, (का व सु), महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / कोषागार अधिकारी, पुणे.
पोलीस महासंचालक यांचे स्वीय सहायक
पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई.
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई.

२/- सदरचे आदेश "Transsfer & Promotion of SP to DIG Techinical शिर्षाखाली महाराष्ट्र पोलीस दलाच्या संकेतस्थळावर ०२ महिन्यांकरीता कृपया प्रसिध्द करण्यात यावेत.

<u>निवडसूची २०२४-२५</u>:
**"पोलीस उप महानिरीक्षक/अपर पोलीस आयुक्त, पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान" या संवर्गातील पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने पदस्थापना करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन आदेश क्र.एच.डी.-११०४८/२७/२०२४, पोल-१अ.**
दुसरा मजला, मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-०३२.
दिनांक: ३१ डिसेंबर २०२४.

<u>संदर्भ</u> :- १) शा.नि., सा.प्र. विभाग, क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्या.-१२, दिनांक ०१.०८.२०१९.
२) शा.नि., सा.प्र. विभाग, क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७.०५.२०२१.
३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्या कार्यालयाचे पत्रे क्र. पोमसं/१/७४३०/पोउपमनि-पदो/कांबळे/८६/२०२२, दि.२८.११.२०२४
४) शासन पत्र, सा.प्र. विभाग, क्र.ईएसबी-११२४/प्र.क्र.१७७/आस्थामं(का.१३), दि.२७.१२.२०२४.

<u>शासन आदेश</u>:-

"पोलीस उप महानिरीक्षक/अपर पोलीस आयुक्त, पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान" या संवर्गातील पदावर पदोन्नती देण्याकरिता आस्थापना मंडळ क्र.२ (सा.प्र. विभाग) यांनी शिफारस केलेली "पोलीस अधीक्षक/पोलीस उप आयुक्त, पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभाग" यांची "<u>निवडसूची २०२४-२५</u>" यामध्ये समाविष्ट असलेल्या, पुढील तक्त्यातील स्तंभ (२) मध्ये नमूद पोलीस अधिकाऱ्यास, "पोलीस उप महानिरीक्षक/अपर पोलीस आयुक्त, पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान" या संवर्गातील पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात, पुढील अटींवर, पदोन्नती देण्यात येत असून, त्यांची स्तंभ (३) मध्ये निर्दिष्ट पदावर, याद्वारे, पदोन्नतीने पदस्थापना करण्यात येत आहे :-

| अ.क्र. (१) | पोलीस अधिकाऱ्याचे नाव (२) | पदोन्नतीने पदस्थापना (३) |
|---|---|---|
| १. | श्री. ईश्वर दामू कांबळे | अपर पोलीस आयुक्त, पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान, बृहन्मुंबई |

<u>अटी</u>:-

१) उक्त पदोन्नती ही विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ या प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णय व आदेश यांच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

२) रिट याचिका (स्टॅम्प) क्र.१०८७६/२०२१ व रिट याचिका (स्टॅम्प) क्र.१०८७८/२०२१ या प्रकरणांमध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई, यांनी दिनांक २५.०५.२०२१ रोजी दिलेल्या

आदेशानुसार उक्त पदोन्नती ही उक्त रिट याचिकांमध्ये होणाऱ्या निर्णयाच्या अधीन राहील.

३) उक्त पदोन्नती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित अधिकारी यांना नियमाधीनतेचा *(regularization)* व सेवाज्येष्ठतेचा *(seniority)* कोणताही हक्क असणार नाही.

४) उक्त पदोन्नती ही "पोलीस उप महानिरीक्षक/अपर पोलीस आयुक्त, पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान, गट-अ" या पदाच्या सेवाप्रवेश नियमांस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता घेण्याच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

२. त्या अनुसार, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण/न्यायालय यांचे आदेश, कायदा व सुव्यवस्था, इत्यादी लक्षात घेऊन पुढील उचित कार्यवाही करावी.

३. हा शासन आदेश, आस्थापना मंडळ क्र.२ (सा.प्र. विभाग) यांच्या शिफारशीनुसार आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम २२न(२) मधील परंतुकानुसार, सर्वोच्च सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

४. हा शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४१२३१११०७०६७७२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANDEEP GORAKHNATH DHAKANE

Digitally signed by SANDEEP GORAKHNATH DHAKANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=[illegible], postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=[illegible], cn=SANDEEP GORAKHNATH DHAKANE
Date: 2024.12.11 15:11:24 +05'30'

**( संदीप गोरखनाथ ढाकणे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
४) अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत-**

१) प्रधान महालेखापाल (लेखा व हकदारी/लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
४) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
५) संबंधित पोलीस अधिकारी *(पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्यामार्फत).*
६) निवड नस्ती, पोल-१अ.